दै. प्रजावाणी

## …चोरणाऱ्या टोळीचा रामतीर्थ पोलीसांकडून पर्दाफाश

# …नेस्टाईल पाठलाग करुन आरोपीस घेतले ताब्यात

…गाव/नरसी, (वार्ताहर) दि. १७ : …द्राबाद महामार्गावरील नरसी येथील …य विश्रामगृहाजवळ संशयीत स्कार्पीओ …न आली. रामतीर्थ पोलीस ठाण्याचे …क पोलीस निरीक्षक गस्तीवर असताना …या स्कॉर्पीओला थांबविण्याचे सांगितले. …ही स्कॉर्पीओ सुसाट वेगाने धावत होती. या …च पोलिसांनी जवळपास ५० कि.मी. …न केला. बिलोली भागात गाडीवार …केला. अखेर तळणी शिवारात ही …ही रामतीर्थ पोलीसांनी ताब्यात घेतली. या …र्पीओमधील फरार असलेला एक आरोपी …हा नरसी बसस्थानकात लपुन बसला …ता. त्या पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीअंती हे आरोपी गुरे चोरणारे असल्याचे निष्पन्न झाले.

अतिरिक्त पोलीस अधिक्षक अविनाश कुमार यांनी या प्रकरणातील अन्य तीन आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आल्याची माहिती येथील पत्रकारांना दिली. या प्रकरणी बिलोली ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

तळणी जवळ स्कॉर्पीओ ही गाडी खड्यात अडकल्याने या गाडीतील सहा गुन्हेगार फरार झाले. त्यातील एका आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक कृष्णा कोकाटे यांनी शुक्रवारी पहाटे नरसी येथे भेट देत या घटनेची माहिती घेऊन पुढील सूचना केली. गुरुवारी रात्री एकच्या दरम्यान सपोनि संकेत दिघे हे सचिन रिदंकवाड, आडे व चालक शे. हबीब या आपल्या सहकार्यासमवेत महामार्गावर गस्त घालत होते. त्याच सुमारास एक स्कार्पीओ गाडी (क्र. एम. एच. ०४ बी. क्यू. २४७९) नरसी येथील विश्रामगृहाजवळ आढळून आली. त्यामध्ये काही जण संशयीतरित्या असल्याचे पोलिसांना लक्षात आले. त्यामुळे पोलिसांनी त्यांना त्याच ठिकाणी



थांबण्यासाठी सांगितले परंतु संबंधित आरोपीने त्या ठिकाणी न थांबता सुसाट वेगाने ती गाडी बिलोलीकडे पळविली. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावला. आणि त्यांनी त्या गाडीचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. गाडी अडवण्यासाठी बिलोली येथील टोल नाक्यावर बॅरिकेट लावले होते. हे बॅरिकेट उडवून गाडी पुढे गेली.

बिलोलीहून ही गाडी कुंडलवाडीकडे वळविली तेव्हा पोलिसांनी कुंडलवाडी येथे ट्रक अडवा लावून गाडी थांबविण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार लक्षात येताच आरोपींनी आपली गाडी पुन्हा बिलोलीकडे वळविली. या दरम्यान या आरोपींनी पोलिसांच्या अंगावर गाडी घाण्याचा प्रयत्न केला. गाडी बिलोली तालुक्यातील तळणी शिवारात स्कॉर्पीटो चालकाचा गाडीवरचा ताबा सुटला व ती एका खड्यात अडकली. तेव्हा सर्व गुन्हेगार गाडी सोडून अंधाराचा फायदा घेत पळून गेले. यातील एका आरोपीस रामतीर्थ पोलीसांनी नरसी बसस्थानाकातून ताब्यात घेतले. या आरोपींची पोलिसांनी चौकशी केली असता, हे आरोपी मुबंई व नांदेड येथील असून ते रस्त्यावर व शेतातील जागलीवर असणारे गुरांना गुंगीचे औषध खावू घालून त्यांना मुर्च्छीत करत होते. त्यानंतर त्यांना वाहनात टाकून त्यांना कत्तलीसाठी नेण्यात येत होते, अशी कबुली दिली.

---

देशोन्नती दि. 18-02-2023

माझं शहर

# सण, उत्सव साजरे करतांना पारंपारिक पध्दतीची जपणूक करा…

## अप्पर पोलिस अधिक्षक डॉ. खंडेराव धरणे यांचे आवाहन




देशोन्नती वृत्तसंकलन…

**भोकर** ▪ भारतीय सण उत्सवाला मोठे महत्त्व आहे. हे सण साजरे करीत असताना पारंपारिक पद्धतीचे वाद्य व रितीरिवाजांची जपणूक करावी असे आवाहन भोकर येथील अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे यांनी शांतता कमिटीच्या बैठकीत बोलताना केले.

येणाऱ्या सण उत्सवाच्या निमित्ताने शिवजयंती, महाशिवरात्री, संत सेवालाल महाराज जयंती व इतर सण उत्सवानिमित्त भोकर पो.स्टे. येथे १४ फेब्रुवारी रोजी शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी प्रथम प्रस्ताविक पोलीस निरीक्षक विकास पाटील यांनी केले येणाऱ्या सण उत्सव जयंतीमध्ये नियमांचे पालन करावे, डी. जे. लावता येणार नाही, दारु पिऊन कुणी धिंगाणा घालणार नाही, इतरांच्या भावना दुखावतील अशा घोषणा देता येणार नाहीत अशी माहिती दिली. सहाय्यक पोलीस अधीक्षक नफकत आमना यांनी सण उत्सवामध्ये कुठलाही धिंगाणा गोंधळ करु नये, दारु पिऊन मिरवणुकीत सामील होऊ नये, छत्रपती शिवाजी राजांचा आदर्श युवकांनी घ्यावा, शहरातील वाहतूक व्यवस्था व अतिक्रमणाच्या बाबतीत पुन्हा एक विशेष बैठक घेऊन मार्ग काढण्यात येईल असे मत मांडले. अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे पुढे बोलताना म्हणाले आगामी काळात येणारे सण उत्सव साजरे करताना आपण पारंपारिक पद्धतीचे वाद्य वापरावीत, पारंपारिक पद्धतीची जपणूक करावी, ढोल ताशे भजनी मंडळ हे वाद्य वाजवावीत, युवा पिढीने कुठलाही धांगड धिंगाणा करु नये, छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा आदर्श युवकांनी घ्यावा, भोकर शहरातील वाहतुकीची समस्या व अतिक्रमणाबाबत एक विभाग जबाबदार नसून सर्व विभाग मिळून निर्णय घेण्यात येईल आपण केलेल्या सूचनांची नक्कीच दखल घेण्यात येईल असेही ते म्हणाले, … तहसीलदार संजय सोलंकर … शांततेत सण उत्सव साजरे क… आवाहन केले, शिवाजी … किन्हाळकर, प्रा. व्यंकट … पत्रकार बी. आर. पांचाळ … शहरातील वाहतूक समस्या … बाबी सुधारण्यात याव्या अ… मांडले. शिवजयंती … सेवालाल महाराज जयंत… महाशिवरात्री यात्रा … पदाधिकाऱ्यांनी आप… मांडले, स.पो.नी. दि… उत्तम बाबळे, सुनील … ताहेर बेग, यांच्यासह … पदाधिकारी व शांतता … उपस्थित होते.